RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ७६] शुक्रवार, सप्टेंबर २०, २०१३/भाद्र २९, शके १९३५ [पृष्ठे १५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १२९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक २० सप्टेंबर २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक सेवाप्र.२०१३/प्र.क्र. १०६/आस्था-९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ महा. ५) याच्या कलम २७४, पोट-कलम (२), खंड (एकोणचाळीस) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी नियमांचा पुढील मसुदा हा, यामुळे बाधा होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी उक्त अधिसूचनेच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा, दिनांक ३० ऑक्टोबर २०१३ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून, प्रधान सचिव, (ग्रामविकास व पंचायत राज) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी कोणत्याही हरकती किंवा सूचना प्राप्त होतील त्यावर शासन विचार करील.

**प्रारूप नियम**

क्रमांक सेवाप्र. २०१३/प्र.क्र. १०६/आस्था-९.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. ५) याच्या कलम २७४, पोट-कलम (२) खंड (एकोणचाळीस) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम २७४ पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे.

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ याला जोडलेल्या परिशिष्ट- चार मधील,–

**(१) (भाग-एक) मध्ये,—**

(अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) प्रथम श्रेणी या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक १ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ब) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) द्वितीय श्रेणी या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक २ च्या नोंदीमधील,—

"(एक) " पद " या शीर्षाखालील स्तंभ (३) मध्ये—

(एक) विस्तार अधिकारी (शिक्षण)

(दोन ) सहायक शिक्षण अधिकारी

(तीन) वरिष्ठ सहायक शिक्षण उपनिरीक्षक "

या मजकुराऐवजी " विस्तार अधिकारी (शिक्षण) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील स्तंभ (४) मध्ये विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती याऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

(१) (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३६ वर्षांपेक्षा अधिक नसेल ; आणि

(दोन) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए. किंवा बी.कॉम. किंवा बी.एस्सी. ही पदवी किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण केली असेल, आणि

(तीन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी किमान ५०टक्के गुणांसह उत्तीर्ण केली असेल, आणि

(चार) ज्यांना मान्यताप्राप्त संस्थेच्या एकतर प्राथमिक विद्यालयातील किंवा माध्यमिक विद्यालयातील किंवा उच्च माध्यमिक विद्यालयातील किंवा अध्यापक विद्यालयातील शासनमान्य पदावरील किमान तीन वर्षांचा अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा अनुभव असेल.

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ; किंवा

(ब) (एक) जे प्राथमिक शिक्षक किंवा माध्यमिक शिक्षक किंवा केंद्रप्रमुख (माध्यमिक) किंवा मुख्याध्यापक (प्राथमिक) या संवर्गातील उमेदवार असतील ; आणि

(दोन) जे या नियमातील खंड (अ) मधील उप-खंड (दोन), (तीन) आणि (चार) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील ; आणि

(तीन) ज्यांनी एकतर, जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा नगरपालिकेमध्ये शिक्षक पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेली असेल

अशा उमेदवारांमधून मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीमधून योग्य उमेदवाराच्या निवडीने ; किंवा

(क) (एक) जे जिल्हा परिषद, नगरपरिषद व नगरपालिकांमधील शिक्षकांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीस पात्र असतील ; आणि

(दोन) जे या नियमातील खंड (अ) मधील उप-खंड (दोन), (तीन) आणि (चार) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील ; आणि

(तीन) ज्यांनी एकतर जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा नगरपालिकेमध्ये किमान तीन वर्षे इतकी अखंड सेवा पूर्ण केलेली असेल ;

अशा उमेदवारांमधून योग्यतेच्या अधीन राहून जिल्हा परिषद, नगरपरिषद व नगरपालिका शिक्षकांच्या एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या आधारे योग्य उमेदवारांमधून पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने व निवडीद्वारे नेमणुका करण्यात येतील.

(३) नामनिर्देशनाने, निवडीद्वारे आणि पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण अनुक्रमे ५०:२५:२५ असे राहील.

(क) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) तृतीय श्रेणी या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ३ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ड) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) प्रथम श्रेणी या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ५ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ई) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) द्वितीय श्रेणी या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ८ मधील नोंदी वगळण्यात येतील.

२. (भाग-दोन) मध्ये,—

(अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (शैक्षणिक) उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक १ च्या नोंदीमध्ये स्तंभ (३) मधील (एक) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक (दोन) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापिका पदाच्या समोर स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शिर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (१) (एक) ज्यांची जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शिक्षण) यामध्ये जिल्हा परिषद/जिल्हा परिषद (माजी शासकीय) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून ५ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा झाली असेल ; किंवा

(दोन) जे विस्तार अधिकारी (शिक्षण) असतील व जे बी.एड. अथवा समकक्ष पदवी धारण करीत असतील व ज्यांच्याकडे ५ वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अखंड अनुभव असेल ;

अशा उमेदवारांमधून एकत्रित सेवाज्येष्ठतेच्या आधारे योग्यतेस अधीन राहून पात्र उमेदवारांमधून पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.

(ब) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) उच्च माध्यमिक शाळेतील अधिव्याख्याते या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक २ च्या नोंदीमध्ये स्तंभ (३) मधील उच्च माध्यमिक शाळेतील (कनिष्ठ महाविद्यालयातील) शिक्षक पदाच्या समोर, स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पद्धती " या शीर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (१) (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि

(दोन) ज्यांनी संच मान्यतेनुसार मान्य असलेल्या विषयाच्या पदासाठी त्या विषयातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह पदवी धारण केली असेल ; आणि

(तीन) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल ;

परंतु असे की, उमेदवाराने शारीरिक शिक्षण यामधील ५० टक्के गुणांसह पदवी व एम.पी.एड. पदवी किंवा ५० टक्के गुणांसह एम.ए.पदवी व एम.एड (शारीरिक शिक्षण) पदवी उत्तीर्ण असले पाहिजे :

परंतु आणखी असे की, उमेदवाराने, ज्या विषयात एम.ए.ची पदवी धारण केली असेल त्या संबंधित विषयाचा व शारिरीक शिक्षण विषयाचा प्रत्येकी ५० टक्के कार्यभार त्यांच्याकडे असेल ;

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ; किंवा

(ब) ज्यांनी माध्यमिक शिक्षक या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून विषयनिहाय मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे तयार केलेल्या गुणवत्तेच्या आधारे पात्र उमेदवारांच्या निवडीने ; नेमणूक करण्यात येईल.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे नेमणुका करण्यात येतील.

(३) नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

(क) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (शैक्षणिक) शाळा समुपदेष्टा या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ३ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ड) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (शैक्षणिक) सहायक शिक्षक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ४ च्या नोंदीऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

| | | | |
|---|---|---|---|
| " ४. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (शैक्षणिक) शिक्षक. | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (माध्यमिक) | १. (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि (दोन) ज्यांनी संच मान्यतेनुसार मान्य असलेल्या विषयाच्या पदासाठी त्या विषयातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह पदवी धारण केली असेल, आणि (तीन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल अशा उमेदवारांमधून एकतर नामनिर्देशनाने ; |

(ब) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेमध्ये प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून योग्यतेच्या अधीन राहून, सेवाज्येष्ठतेच्या आधारे, विषयनिहाय पदांवर पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने ;

परंतु असे की, संबंधित वर्षात पदोन्नतीसाठी प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या संवर्गातून विषयनिहाय प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध न झाल्यास ती पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात येईल.

(३) नामनिर्देशनाने आणि पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ५०:५० असे राहील."

(ई) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (शैक्षणिक) चित्रकला शिक्षक / अध्यापक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ५ च्या नोंदीमध्ये स्तंभ (३) मधील चित्रकला शिक्षक / अध्यापक पदाच्या समोर, स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पद्धती' या शिर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणूकीच्या पद्धती या मजकूराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (१) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल ; आणि

(दोन) ज्यांनी कला अध्यापक प्रमाणपत्र किंवा राज्य शासनाने अशा प्रमाणपत्रास समकक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे असे प्रमाणपत्र धारण केले असेल ; आणि

(तीन) ज्यांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केंद्र सरकारने किंवा महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेली शिक्षक पात्रता चाचणी (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण केली असेल; अशा उमेदवारांमधून सामाईक प्रवेश चाचणीद्वारे (C.E.T.) नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात येईल. "

(फ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) (स्नातक) हिंदी शिक्षकांस भाषा शिक्षक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ६ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ग) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) गृह विज्ञान – अध्यापक / अध्यापिका या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ७ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(ह) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) लघुलेखन, टंकलेखन निदेशक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ७ अ च्या नोंदीमधील स्तंभ (३) मधील लघुलेखक व टंकलेखन निदेशक पदाच्या समोर स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

(१) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल; आणि

(दोन ) ज्यांनी, माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र किंवा समकक्ष अर्हता धारण केली असेल; आणि

(तीन) ज्यांनी, आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ किंवा महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ किंवा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या आवश्यकतेनुसार मराठी किंवा इंग्रजी लघुलेखनातील १०० शब्द प्रति मिनिटपेक्षा कमी नसेल इतक्या वेगाचे लघुलेखन परीक्षा प्रमाणपत्र आणि मराठी किंवा इंग्रजी टंकलेखनातील ४० शब्द प्रति मिनिटपेक्षा कमी नसेल असे टंकलेखन परीक्षा प्रमाणपत्र धारण केले असेल

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात येईल.

(आय ) अनुक्रमांक ७ अ च्या नोंदी नंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | | |
|---|---|---|---|
| ७ ब | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक | केंद्रप्रमुख | (१) (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३६ वर्षांपेक्षा अधिक नसेल ; आणि<br>(दोन) ज्यांनी संबंधित विषयामध्ये कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह पदवी धारण केली असेल, आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी. एड. अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल ; आणि<br>(तीन ) ज्यांनी मान्यताप्राप्त संस्थेच्या एकतर प्राथमिक किंवा माध्यमिक विद्यालय किंवा उच्च माध्यमिक विद्यालय किंवा अध्यापक विद्यालय किंवा इतर कोणतेही महाविद्यालय यामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याने मंजुरी दिलेल्या शासनमान्य पदावरील किमान ३ वर्षांचा अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा अनुभव असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ;<br>(ब) (एक) जे या नियमातील खंड (अ) मधील उपखंड (दोन) आणि (तीन) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील ; आणि<br>(दोन) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून विषयनिहाय मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे पात्र उमेदवाराच्या निवडीने ;<br>(क) ज्यांनी, जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल आणि सेवाज्येष्ठता व विषयनिहाय मर्यादित विभागीय स्पर्धापरीक्षेच्या आधारे तयार केलेली विषयनिहाय गुणवत्ता यादी यांच्या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल.<br>(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे नेमणुका करण्यात येतील.<br>(३) नामनिर्देशन, निवड आणि पदोन्नती याद्वारे करावयाच्या नेमणूकीचे प्रमाण ४०:३०:३० असे राहील. |

(४) (एक) एकूण मंजूर पदांपैकी भाषा, गणित व विज्ञान, सामाजिक शास्त्रे (इतिहास, भूगोल) या विषयांसाठी पदांची विभागणी समप्रमाणात राहील ;
(दोन) या खंडाच्या उपखंड (एक) मध्ये नमूद केलेल्या विषयांसाठी भरतीचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :—

(१) भाषा :—
(एक) इंग्रजी — ५० टक्के
(दोन) प्रथम भाषा — मराठी, उर्दू इ. — ३० टक्के
(तीन) द्वितीय भाषा — हिंदी — २० टक्के

(२) गणित व विज्ञान १०० टक्के

(३) सामाजिक शास्त्रे इतिहास व भूगोल — १०० टक्के. "

(जे) स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक ८ च्या नोंदीमध्ये स्तंभ (३) मधील प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक पदाच्या समोर स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" १ (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा अधिक नसेल ; आणि

(दोन) ज्यांची ५ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी प्राथमिक शिक्षक म्हणून अखंड सेवा झाली असेल ; आणि

(तीन) ज्यांनी संच मान्यतेनुसार मान्य असलेल्या कोणत्याही विषयातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह पदवी धारण केली असेल ; आणि

(चार) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल; आणि

(पाच) ज्यांनी निवडीच्या वैध कालावधीत राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (N.C.T.E.) यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केंद्र सरकारने किंवा महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेली शिक्षक पात्रता चाचणी (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण केली असेल व पात्रता परीक्षा प्रमाणपत्र धारण केले असेल

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ; किंवा

(ब) (एक) जे या नियमाच्या खंड (अ) मधील उप-खंड (दोन), (तीन), (चार) आणि (पाच) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करीत असतील ; आणि

(दोन) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक (पदवीधर) या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल

अशा उमेदवारांमधून विषयनिहाय पदावर मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे पात्र उमेदवाराच्या निवडीने ; किंवा

(क) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक (पदवीधर) या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारांमधून सेवाज्येष्ठतेच्या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने ;

नेमणूक करण्यात येईल.

(२) जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे नेमणुका करण्यात येतील.

(३) नामनिर्देशन, निवड आणि पदोन्नती याद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ४०:३०:३० असे राहील.'

(के) जिल्हा सेवा (वर्ग-तीन)(दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील शिक्षक / अध्यापक या सेवा व संवर्गाच्या संबंधित

स्तंभ (४) मधील " नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती " या शीर्षाखालील विद्यमान अर्हता व नेमणुकीच्या पद्धती या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल ; आणि

(दोन) (अ) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्रातील दोन वर्षांची पदविका (डी.टी.एड.) उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ब) ज्यांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (National Council for Teacher Education) अन्वये घटीत केलेल्या अधिनियम, मानके व कार्यपद्धती विनियम २००२ (Regulation, Norms and Procedure) Regulation, २००२ नुसार कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाची किमान ४५ टक्के गुणांसह उच्च माध्यमिक शालान्त किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि कोणत्याही.मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षण शास्त्रातील दोन वर्षांची पदविका उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(क) मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक शालान्त किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि चार वर्षीय प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी (Bachelor of Elementary Education) उत्तीर्ण केली असेल; किंवा

(ड) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० टक्के गुणांसह उच्च माध्यमिक शालान्त किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेची २ वर्षांची शिक्षक शिक्षण पदविका (विशेष शिक्षण) उत्तीर्ण केली असेल; किंवा

(ई) ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेची २ वर्षांची शिक्षक शिक्षण पदविका उत्तीर्ण केली असेल, किंवा

(फ) ज्यांनी शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक टीसीएम. २००९/३६/०९/माशि. ४, दिनांक १० जून २०१० अन्वये उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा प्रमाणपत्राच्या (एम.सी.व्ही.सी.) शाखेअंतर्गत कृषी गटातील उद्यानविज्ञा व पीक शास्त्र परीक्षा (Horticulture and Crop Science) आणि आरोग्य व वैद्यकीय सेवा गटातील बाल संगोपन व शालेयपूर्व व्यवस्थापन (Crench and Pre School Management) परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्रातील दोन वर्षांची पदविका उत्तीर्ण केली असेल ; आणि

(तीन) ज्यांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेली शिक्षक पात्रता चाचणी (Teacher Eligibility Test) उत्तीर्ण केली असेल ;

(चार) ज्यांनी सामाईक प्रवेश चाचणी उत्तीर्ण केली असेल.

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात यईल.

(ल) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेतील स्नातकेतर हिंदी शिक्षक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक १२ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(म) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) पूर्व माध्यमिक शाळा विभागातील मुख्याध्यापक या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक १४ मधील नोंदी वगळण्यात येतील.

(न) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेच्या पूर्व माध्यमिक विभागातील सहायक अध्यापक व सहायक अध्यापिका या सेवा व संवर्गाच्या संबंधित अनुक्रमांक१५ च्या नोंदीऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

| | | | |
|---|---|---|---|
| " १५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेच्या पूर्व माध्यमिक विभागातील सहायक अध्यापक व सहायक अध्यापिका | प्रशिक्षित पदविधर शिक्षक (प्राथमिक) | १. (अ) (एक) जे आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) ज्यांनी, संबंधित पदासाठी विशिष्ट विषयातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह पदवी धारण केली असेल, आणि<br>(तीन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी धारण केली असेल ; अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने ; |

(ब) (एक) ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल ; आणि

(दोन) ज्यांनी या नियमातील खंड (अ)मधील उप-खंड (दोन) आणि (तीन) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण केली असेल ;

अशा उमेदवारांमधून, विषयनिहाय मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे पात्र उमेदवारांच्या निवडीने ;

(क) (एक) ज्यांनी जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शिक्षक पदावर किमान ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल ; आणि

(दोन ) ज्यांनी या नियमातील खंड (अ) मधील उप-खंड (दोन) आणि (तीन) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांमधून सेवाज्येष्ठता व विषयनिहाय यादी यांच्या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने ;

नेमणूक करण्यात येईल.

२. जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार नामनिर्देशनाने आणि निवडीद्वारे नेमणुका करण्यात येतील.

३. नामनिर्देशन, निवड आणि पदोन्नती याद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ४०:३०:३० असे राहील.

४. (एक) एकूण मंजूर पदांपैकी भाषा, गणित व विज्ञान सामाजिक शास्त्रे (इतिहास, भूगोल) या विषयांसाठी पदांची विभागणी समप्रमाणात राहील ;

(दोन) या खंडाच्या उपखंड (एक) मध्ये नमूद केलेल्या विषयांसाठी भरतीचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :—

भाषा– इंग्रजी १०० टक्के

गणित व विज्ञान – १०० टक्के

सामाजिक शास्त्रे (इतिहास व भूगोल) – १०० टक्के

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सु. र. सुर्वे,

शासनाचे उप सचिव.